Admn.order

**संदर्भ -**

१. क्र.३/१३(३)/२००८-पीपी-आय,भारत सरकार,अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय नवीदिल्ली,दि.११/०२/१०..

1620

जाक्र/जिग्राविंयहिं/इंआयो/कावि/ /११

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली

दिनांक-२५/०२/२०११

**प्रशासकीय मान्यता आदेश**

मी अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे सन **२०१०-२०११** अंतर्गत **केंद्रीय बहुल योजनेअंतर्गत** (MSDP)प्रति घरकूल रु. ६८,५००/- (ज्यात केंद्र शासनाचे रु. २६२५०/-, राज्य शासनाचा नियमित हिस्सा रु. ८७५०/-, राज्य शासनाचा अतिरिक्त हिस्सा रु. ३३५००/-) ऐवढे अनुदान देय राहिल. त्या व्यतिरिक्त लाभधारकाचा हिस्सा रु. १५००/- अशी एकूण रु. ७००००/- घरकुलाची अंदाजित रक्कम असेल. त्या प्रमाणे खालील नियम व अटींच्या अधीन राहून सोबतच्या यादीतील घरकुलांना प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

| अ.क्र. | तालुका | मंजूर घरकुले | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुस्लीम | अनु. जाती | अनु. जमाती | इतर | एकूण | अपंग |
| १ | औंढा | 0 | 38 | 24 | 82 | 144 | 0 |
| २ | वसमत | 0 | 213 | 17 | 313 | 543 | 0 |
| ३ | हिंगोली | 0 | 127 | 10 | 217 | 354 | 6 |
| ४ | कळमनुरी | 5 | 122 | 25 | 124 | 276 | 2 |
| ५ | सेनगाव | 0 | 118 | 6 | 86 | 210 | 5 |
| | एकूण | 5 | 618 | 82 | 822 | 1527 | 13 |

**-नियम व अटी-**

१. सदरच्या घरकुलांचे बांधकाम लाभधारकांच्या मालकीचे किंवा ग्रामपंचायत ज्या जागेवर अथवा शासकीय भूखंडावर लाभार्थी मार्फतच करण्यात यावे तसेच अस्तित्वात असलेल्या घराचा लाभधारका समवेत रंगीत फोटो घेण्यात यावा.

२. ज्या ठिकाणी शासकीय भूखंड आहे अशा प्रकरणामध्ये सदरील भूखंड रितसर संबंधित तहसीलदारांकडून हस्तांतरीत करून घेऊन काम सुरू करावे.

३. सदरील घरकुलासाठी किमान १०० चौमी क्षेत्रफळाचा मोकळा भूखंड आवश्यक असून त्यावर शासन निकषान्वये २६९(२५चौ.मी.) चौ. फुटाचे बांधकाम करण्यात यावे. या आराखड्यात बदल करावयाचा असल्यास या कार्यालयाच्या पूर्व परवानगीशिवाय करू नये.

४. मंजूर व पात्र लाभधारकांच्या नावे लाभधारकांच्या स्वतःच्या मालकीची जागा नसल्यास ग्राम पंचायतीमार्फत भूखंड वाटप करून नंतर प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करावी.

District Planning Officer
hingoli
Inword No ...........
Date...........
Clerk-

५. एकाच कुटुंबातील दोन किंवा अधिक व्यक्तीस वेगवेगळी घरकुले देता येणार नाहीत. तसेच लाभधारकांच्या कुटुंबात कोणत्याही व्यक्तीस अन्य कोणत्याही योजनेतून घरकुलाचा अथवा घरकुलासाठी अनुदानाचा लाभ मिळालेला नसावा. तसेच कुटूंब प्रमुखाऐवजी इतर व्यक्तीच्या नावे घरकुल प्रस्तावित असेल तर प्रस्तावित व्यक्तीचे नाव कुटूंब पत्रिकेत असणे आवश्यक आहे त्याची तपासणी गट-विकास अधिकारी यांनी करावी,अपात्र लाभधारकांना या योजनाचा लाभ दिला जाणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी यांचेवर राहील. दारिद्र्यरेषेखाली नसणारे चुकीचा दारिद्र्यरेषा क्रमांक देऊन प्रस्तावित केलेले ग्रामसभेव्दारे निवड न केलेले इत्यादीबाबत या योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी प्रस्तावित केले असल्यास त्याची काळजीपूर्वक मूळ तपासणी करून तसे लाभधारक अपात्र ठरवावेत.
यानंतरही अपात्र लाभधारकांस या योजनेचा लाभ दिला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी यांचेवर राहील.

प्रकल्प संचालक

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

Admn.order

६. घरकुलाच्या बांधकामाबरोबर परिसर सुधाराचे कामास सुरुवात करावी..

७. लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्यांपैकी शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असल्याचे आढळून आल्यास त्याचे घरकूल तात्काळ रद्द करण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित करावी.

८. कोणत्याही परिस्थितीत ठेकेदारामार्फत या योजनेअंतर्गत बांधकाम करण्यात येऊ नये.

९. संबंधित गट विकास अधिकारी यांनी सादर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीवरूनच दारिद्र्य रेषा क्रमांक (सन २००२ च्या सर्वेक्षणा) प्रमाणे लाभधारक निवडीबाबत ग्राह्य धरलेला आहे. या प्रकरणी संबंधित गट विकास अधिकारी यांनी तपासणी करूनच लाभार्थ्यास आदेश द्यावेत त्यामध्ये कोणतीही अनियमितता आढळ्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी यांचेवर राहील.

१०. घरकुलाचे बांधकामासाठी शासनाने निर्धारीत केलेल्या अर्थिक मर्यादेत म्हणजेच **प्रति घरकूल रु. ६८,५००/- (ज्यात केंद्र शासनाचे रु. २६२५०/-, राज्य शासनाचा नियमित हिस्सा रु. ८७५०/-, राज्य शासनाचा अतिरिक्त हिस्सा रु. ३३५००/-) ऐवढे अनुदान देय राहिल. त्या व्यतिरिक्त लाभधारकाचा हिस्सा रु. १५००/- अशी एकूण रु. ७००००/- घरकुलाची अंदाजित रक्कम असेल.** सदरील तरतुदीमध्ये शासनाने कांही फेरबदल केल्यास त्याप्रमाणे अनुदान देय राहील. व त्याचे पालन करण्याची जबाबदारी संबधीत लाभधारक व पंचायत समिती यांचेवर राहील.

११. घरकुलाचे बांधकाम चालु वित्तीय वर्षाच्याआत (तीन महिन्यात) पुर्ण करण्याची जबाबदारी संबधीत लाभधारक/कनिष्ठ अभियंता/ पंचायत समिती यांची राहील.

१२. स्वतः लाभधारक घरकुलाचे बांधकाम करीत असेल्यामुळे जस जसे बांधकाम होईल त्यानुसार **तीन टप्प्यात** नियमाप्रमाणे अनुदान वितरीत करण्यात यावे.. मंजूर

अ) कामासाठी **पहिला हप्ता रू.२५०००/-** घरकुल झाल्यानंतर वितरीत करण्यात यावा.

ब) कामासाठी **दूसरा हप्ता रू.२५०००/-** लिंटेल पातळीपर्यंत नजर पाहणी करुन वितरीत करण्यात यावा.

क) कामासाठी **तिसरा हप्ता रू.१८५००/-** काम पूर्ण झाल्यानंतर वितरीत करण्यात यावा

१३. मंजूर यादीमध्ये पंचायत समिती स्तरावर या कार्यालयाच्या पुर्व परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येऊ नये. तसे केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत पंचायत समितीवर राहील.

१४. या योजने अंतर्गत मंजूर निधीतून कर्मचारी वर्गावर कोणताही खर्च करण्यात येऊ नये.

१५. कामाची गुणवत्ता चांगली राहण्यासाठी लाभधारकाने स्वतःच्या घरकुलाचे बांधकाम स्वतःच करणे बंधनकारक राहील.

१६. सदरच्या घरकुलाची संयुक्त मालकी पती व पत्नी दोघांचीही राहील. व तशी नोंद ग्रामपंचायत रजिष्टर नमुना नंबर ८ ला घेणे बंधनकारक राहील.

१७. भूखंड वाटयाच्या ताबा पावत्या व घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर घरकुल वाटपाच्या ताबा पावत्या गट विकास अधिकारी यांनी त्या त्या वेळी त्यांचे स्तरावर घेणे बंधनकारक राहील.

१८. घरकुलासाठी जागा त्या गावाच्या वस्ती पासुन जवळ व लाभधारक त्या जागेत राहण्यास तयार असेल अशीच जागा घरकुल बांधकामासाठी निवडण्यात यावी.

१९. घरकुलाचे बांधकाम स्वतः लाभधारक करीत असल्यामुळे संबंधीत लाभधारकाकडून रु.२०/- चे कोर्ट स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करुन घ्यावा..करारनाम्यामध्ये काम विहीत मुदतीत (**तीन महिन्यात**)करुन देणे लाभधारकास बंधनकारक राहील व रकमेचा अपहार झाल्यास माझ्याकडुन सदर रक्कम वसूल करण्यात येइल असे स्पष्ट करण्यात यावे.

२०. घरकुल बांधकामात कांही अनियमितता आढळून आल्यास या कार्यालयास तात्काळ अवगत करावे व यासंबंधी कांही तक्रारी असल्यास यंत्रणेकडे अहवाल सादर करावा.

२१. घरकुल बांधकाम विहित मुदतीतच पूर्ण करावे. व बांधकामाचा अर्थिक व भौतिक अहवाल दर महिन्याच्या ४ तारखेपर्यंत लाभार्थीनिहाय सादर करणे बंधनकारक राहील.

२२. या योजने अंतर्गत निधीचे स्वतंत्र खाते बँकेत ठेवावे व खर्चाचा हिशोब स्वतंत्र ठेवावा व घरकुल पूर्ण झाल्यावर अंतिम मुल्यांकन प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२३. या व्यतिरिक्त योजने अंतर्गत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचना पंचायत समिती स्तरावर कळविण्यात येतील. व त्याचे पालन करणे संबधीत पंचायत समिती यांची जबाबदारी राहील.

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
हिंगोली

२४. मंजूर करण्यात आलेल्या लाभार्थीची यादी पंचायत समिती स्तरावरील सूचना फलकावर प्राप्त झाल्या बरोबर लावणे बंधनकारक असून संबधीत ग्रामपंचायत व लाभधारकास कळविणे आवश्यक राहील.

२५. आपल्या स्तरावर हातवाही चुलीचा पुरवठा करण्यात यईल. सदर चुली घरकुल लाभधारकांना वाटप करुन प्रती चुल **रु. ४५५/-** प्रमाणे मुल्यांकना मधून कपात करावी.सदरील सर्व मंजुर घरकुलांचे

२६. **लाभधारक निहाय मंजुर रक्कम व खर्चाचे रजिस्टर लेखा विभागात ठेवण्यात यावे.**

२७. कुटुंबातील **वारसाची कार्यवाही** व नावातील किरकोळ स्वरूपाची दुरुस्ती प्रकल्प संचालक यांचे स्तरावर करण्यात यावी व तसे **या कार्यालयास** अवगत करण्यात यावे.

२८. एखाद्या लाभार्थ्याकडे पक्के घर आढळल्यास त्यास अपात्र ठरवण्यात यावे.

वरील सर्व अटीची पूर्तता करुनच बांधकामास सुरुवात करावी. वरील कोणत्याही अटीची पूर्तता न करता बांधकाम सुरु केल्यास पुढे अडचणी उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत गट विकास अधिकारी यांचेवर राहील.

अध्यक्ष कार्यकारी समिती,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली.

प्रतिलिपी :-

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जि.प. हिंगोली यांना देवून कळविण्यात येते की, संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालय बांधकामासाठी सोबतच्या यादीतील लाभधारकांना अनुदान वितरीत केल्यास घरकुल बांधकामासोबत शौचालयाचे काम पूर्ण करणे सोईचे होईल. करीता पुढील कार्यवाहीस्तव देण्यात येते.

२. गट-विकास अधिकारी पंचायत समिती,औंढा/हिंगोली/कळमनुरी/सेनगाव यांना पुढील कार्यवाहिस्तव